# पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय (मपमविवि),
# मूर्तीजापूर रोड, कृषिनगर, अकोला-४४४१०४

जा. क्र. : पवैम-अकोला / एलएफसी/ 1516 /२०२६ दिनांक : 03 / 9 /२०२६

## दरपत्रक मागविण्याची सूचना

विषय : पशुधन प्रक्षेत्र संकुल येथील दैनंदिन / हंगामी / गरजेनुसार करावयाची मजुरीची कामे करण्यासाठी सीलबंद दरपत्रक मागविणेबाबत......

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला अधिनस्त पशुधन प्रक्षेत्र संकुल येथील खालील नमूद दैनंदिन / हंगामी / गरजेनुसार करावयाची कामे कंत्राटी पद्धतीने प्रतिदिन आवश्यकतेनुसार करवून घेण्याचे प्रस्तावित आहे:

कामाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

जनावराच्या गोठ्यातील शेणमूत्र दररोज काढणे, गोठा दररोज स्वच्छ करणे, शेणमुत्राची नाली साफ करणे, ई.
जनावरांना दररोज पाणी पाजणे, चारा/खाद्य टाकणे.
जनावरे पाण्याने धुणे, पाण्याची टाकी साफ करणे.
जनावरे चारायला नेणे व नंतर परत आणून बांधणे.
दररोज दोन वेळा दुध काढणे.
संकलित दुध विक्रीस मदत करणे.
जनावरे उपचारासाठी दवाखान्यात नेणे.
दुधाच्या कॅन स्वच्छ करणे.
गोठ्यातील शेण खड्ड्यात (Manure Pit) पुरणे.
खाद्याची पोती/भेली खाद्य भांडार येथून आणणे.
चारा व पशुखाद्याची ने-आण करणे व खाद्य भांडार येथे व्यवस्थित ठेवणे.
परिसरातील गवत काढणे, परिसर स्वच्छ ठेवणे
प्रक्षेत्रावरील यंत्रे दुरुस्ती व त्यासारख्या आपात्कालीन कामात मदत करणे.
पेरणीसाठी शेत तयार करतांना मदत करणे.
सऱ्या-वाफे-दांड तयार करतांना मदत करणे.
पेरणी करण्यास मदत करणे.
चारा प्रक्षेत्रावरील चारापिकांना पाणी देणे.
शेतामध्ये खत पसरविणे.
गरज पडल्यास पिकांवर कीटकनाशकांची फवारणी करणे.
निंदन करणे, चारा कापणी करणे, ठोंब काढणे.
कुक्कुट प्रक्षेत्र येथे पक्ष्यांना खाद्य – पाणी देणे,
कुक्कुट प्रक्षेत्र येथे पक्षी निवारे, परिसर, स्वच्छतागृहे यांची स्वच्छता
खाद्य तयार करणे
प्रात्यक्षिकादरम्यान मदत करणे
प्रक्षेत्रावरील मालमत्तेची देखरेख करणे.
वेळेवर उद्भवलेली सर्व कामे करणे.
संबंधित अधिकाऱ्यांनी, वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे पार पाडणे.

कृपया मागे पहा -----

अटी व शर्ती:

1. दर प्रती दिन प्रमाणे नमूद करावे.
2. स्थापित कंत्राट कार्यारंभ आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यासाठी वैध राहील.
3. कंत्राटदाराला सूचनेत नमूद केलेली कामे केल्याबद्दल करण्यात येणाऱ्या मासिक देयकाचे भुगतान बँकेमार्फत करणे अनिवार्य असल्यामुळे कंत्राटदाराचे बँकेत खाते असणे आवश्यक आहे; तसेच कंत्राटदाराकडे स्वत:चे पन कार्ड असणे आवश्यक आहे.
4. कंत्राटदाराला काम ठेक्याचा कालावधी संपण्यापूर्वी सोडायचे असल्यास त्याने एक महिना आधी आगाऊ सूचना देणे आवश्यक राहील. तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधित ठेकेदाराकडून एक महिन्याच्या वेतनाईतकी रक्कम वसूल करण्यात येईल तसेच . .अशी व्यक्ती भविष्यात कामाचा ठेका देण्यास अपात्र ठरविली जाऊ शकेल
5. स्थापित कंत्राट कोणतेही कारण न दाखविता केव्हाही रद्द करण्याचे अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांचेकडे राखून ठेवले आहेत.
6. सदर दरपत्रके बोलविण्याची सूचना कुठलीही पूर्वसूचना न देता रद्द करणे / त्यात आंशिक फेरबदल करणे या बाबतचे अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांचेकडे राखून ठेवले आहेत.
7. कामाचे ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाचे जिविताच्या नुकसानीची जबाबदारी संपूर्णपणे संबंधित कंत्राटदाराची असेल व त्यासाठी हे महाविद्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही. तसेच कामादरम्यान महाविद्यालयाच्या जैविक अजैविक-मालमत्तेचे नुकसान झाल्यास सदर नुकसानीची जबाबदारी संपूर्णपणे संबंधित कंत्राटदाराची / मनुष्यबळाची असेल व त्यासाठीच्या नियमानुसार करावयाच्या नुकसान भरपाईसाठी सदर कंत्राटदार जबाबदार असेल. अधिनस्त मजुरांना मजुरी अदा करण्याचा त्याचप्रमाणे अपघात विमा, सेवाकर, इतर तत्सम बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी पूर्णतः कंत्राटदाराची म्हणजेच सेवापुरवठादाराची असेल व त्याने ही कार्यवाही महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभाग, इतर संबंधित विभाग यांचेकडून वेळोवेळी निर्गमित विविध आदेश, परीपत्रके, अधिसूचना, शासन निर्णय, नियमावली, ईत्यादीच्या अधीन राहून करावी. असे विविध आदेश, परीपत्रके, अधिसूचना, शासन निर्णय, नियमावली, ईत्यादीची माहिती सेवापुरवठादाराने स्वतः स्वक्रियाशिलतेने करून घ्यावी. यासाठी हे महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.
8. पशुधन प्रक्षेत्र संकुल येथील सर्व बाबी ह्या प्राणी जिवीताशी प्रत्यक्ष संबंधित असल्याने तेथील कामांचे महत्त्व लक्षात घेता ठरवून दिलेली तसेच अनुषंगिक कामे व महाविद्यालयाच्या मालमत्तेची देखरेख गांभिर्यपूर्वक करणे आवश्यक राहील.
9. दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, अकोला यांना राहतील.
10. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत 'दरपत्रक - दैनंदिन कामे - पशुधन प्रक्षेत्र' असे लिहावे.
11. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.
12. सीलबंद दरपत्रके सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, कृषिनगर, अकोला-४४४१०४ या पत्यावर बुधवार, दिनांक ०९/०९/२०२६ च्या सायंकाळी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

**सहयोगी अधिष्ठाता**
**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय**
अकोला-४४४१०४

प्रत:

सूचना फलक – पवैम, अकोला / पशुधन प्रक्षेत्र संकुल, पवैम

मा. सहयोगी अधिष्ठाता यांचे तांत्रिक अधिकारी, पवैम, अकोला यांनी सदर सूचना विस्तृत प्रसिद्धीसाठी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रकाशित करण्यास्तव योग्य कार्यवाही करावी, ही विनंती.

फर्मचे नाव शिक्का

---

## हमीपत्र

मी / आम्ही निम्नस्वाक्षरीकार मे------------------------ पत्ता---------------- हमीपत्र लिहून देतो कि, आपल्या कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात क्र.------------------------------------------ मध्ये नमूद साहित्य / सेवा_ पुरविण्याकरीता मी / आम्ही इच्छुक आहे / आहोत. सदर जाहिराती करीता मी / आम्ही फक्त एकच दरपत्रक / निविदा सादर केले आहेत. तसेच जाहिरात प्रसिद्ध करणाऱ्या कार्यालयाशी माझे कुठलेही हितसंबंध नाहीत.

फर्मचा सही व शिक्का